लोकमत पुणे, मंगळवार, दि. २४ मे २०१६

# सपचा पदवीप्रदान समारंभ



स. प. महाविद्यालयाच्या पदवीप्रदान प्रसंगी गिरीष बापट व इतर मान्यवर.

**पुणे** : सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचा पदवीप्रदान समारंभ नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. पालकमंत्री गिरीश बापट यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

या वेळी शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष ॲड. एस. के. जैन, प्राचार्य दिलीप शेठ, मंडळाचे सदस्य वसंतराव देसाई, सतीश पवार, ॲड. मिहिर प्रभुदेसाई, दामोदर भंडारी, सुरेश देवळे, केशव वझे आदी उपस्थित होते. यूपीएसी परीक्षेत पहिला आलेला माजी विद्यार्थी योगेश कुंभोजकर तसेच प्रवीण निकम, श्रुती गाडगीळ, नीलिमा बोराडे, शुभम काजळे, मधुरा तांबे, कृतिका देव, प्रतीक्षा शिंगवेकर, अश्विनी देशपांडे, केतकी दातार, ऐश्वर्या इनामदार, अंकिता मठाधिकारी या गुणवंत विद्यार्थ्यांचा या वेळी सन्मान करण्यात आला.

केवळ नोकरी मिळवण्यासाठी नाही, तर सामाजिक बांधिलकीचा संस्कार जपण्यासाठी पदवी प्रशस्तिपत्रक प्रतीक आहे, असे मत बापट यांनी व्यक्त केले. आधुनिक तंत्रज्ञाच्या आहारी न जाता त्याचा विधायक वापर करा, सामाजिक बांधिलकी व मानवता जपा, असे मार्गदर्शन ॲड. जैन यांनी केले.

# आधुनिक तंत्रज्ञानाच्या आहारी जाऊ नका

## ॲड. एस. के. जैन; स. प. महाविद्यालयात पदवीदान समारंभ

**पुणे, दि. २३ (प्रतिनिधी)** - 'आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा विधायक वापर करा, पण त्याच्या आहारी जाऊ नका. समाजासाठी आज काय केले हा प्रश्न रोज स्वत:ला विचारा व सामाजिक बांधिलकी व मानवता जपा', असे मत शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष ॲड. एस. के. जैन यांनी व्यक्त केले. स.प.महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा पदवीप्रदान समारंभात ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री गिरीष बापट, प्राचार्य दिलीप शेठ, संस्थेचे सदस्य वसंतराव देसाई, सतीश पवार, ॲड. मिहिर प्रभूदेसाई, दामोदर भंडारी, सुरेश देवळे, केशव वझेसह आदी उपस्थित होते. बापट म्हणाले, हा क्षण आपण सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवा. केवळ नोकरी मिळवण्यासाठी नाही, तर सामाजिक बांधिलकीचा संस्कार जपण्यासाठी पदवी प्रशस्तीपत्रक हे प्रतिक आहे.



**पुणे: स. प. महाविद्यालयाच्या पदवीप्रदान समारंभाचे उद्घाटन करताना पालकमंत्री गिरीष बापट, ॲड. एस. के. जैन, प्राचार्य दिलीप शेठ आदी उपस्थित होते.**

यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांना पदवीप्रदान करण्यात आल्या. यूपीएससीत महाराष्ट्रात प्रथम आलेला माजी विद्यार्थी योगेश कुंभेजकर, प्रवीण निकम, संस्कृत विषयात पारितोषिक मिळवलेली श्रृती गाडगीळ, गणिताची शिष्यवृत्तीप्राप्त नीलिमा बोराडे, युवा आयर्नमॅन ठरलेला शुभम काजळे, शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त मधुरा तांबे, अभिनय क्षेत्रात उत्तम कामगिरी करीत असलेली कृतिका देवयासह प्रतीक्षा शिंगवेकर, अश्विनी देशपांडे, केतकी दातार, ऐश्वर्या इमानदार, अंकिता मठाधिकारी या विद्यार्थ्यांना सन्मान करण्यात आला. प्राचार्य दिलीप शेठ यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. गंगाधर शिरूडे, उदय सांळुखे यांसह प्राध्यापकवर्ग उपस्थित होता.

प्रभात पुणे, मंगळवार, दि. २४ मे २०१६